## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन दि. १२ व १३ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. या संशोधन स्पर्धेत ३४७ प्रवेशिका असणार आहे.

ऑक्टोबर महिन्यात जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा घेण्यात आली. त्यामधील विजेत्यांचा विद्यापीठस्तरीय संशोधन स्पर्धेत सहभाग राहणार आहे. पदवी, पदव्युत्तर आणि संशोधक या तीन गटांमध्ये ही स्पर्धा होणार असून त्यामध्ये १) कृषी व पशुसंवर्धन २) वाणिज्य, व्यवस्थापन व विधी ३) अभियांत्रिकी व तंत्रज्ञान ४) मानव्य विज्ञान, भाषा व ललितकला ५) वैद्यकीय व औषधीनिर्माण शास्त्र ६) विज्ञान या विषयातील मोड्युल व पोस्टर्स द्वारे विद्यार्थी आपले संशोधन सादर करणार आहे. ३४७ पैकी ३०६ पोस्टर्स व ४१ मोडयूल यांचा सहभाग आहे. मंगळवार दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात इंडियन केमीकल टेक्नॉलॉजीच्या जालना कॅम्पसचे संचालक प्रा. उदय अन्नापुरे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी हे अध्यक्ष राहतील. १३ डिसेंबर रोजी सायं. ४.३० वाजता कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरण समारंभ होईल.

यावर्षीच्या स्पर्धेत संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांना ई-प्रमाणपत्र दिले जाणार आहे. कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजनेत सहभागी असलेल्या संशोधक विद्यार्थ्यांचे सादरीकरण यापुर्वी घेण्यात आले असून त्यामध्ये गुणवत्तापुर्ण संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांना देखील पारितोषिक दिले जाणार आहे. अशी माहिती समन्वयक प्रा. जे.व्ही. साळी यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील व्यवस्थापन शास्त्र प्रशाळा आणि युजीसी मानव संसाधन विकास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या ऑनलाईन रिफ्रेशर प्रोग्रामचा समारोप नुकता झाला.

२१ नोव्हेंबर पासून दोन आठवड्यांचा हा कोर्स ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आला. केरळ, गुजरात, पुणे येथील विद्यापीठांमधून नामांकित तज्ज्ञांनी ऑनलाईन सत्र घेतले. समारोप प्रसंगी मानव संसाधन विकास केंद्राचे समन्वयक प्रा. सचिन सुर्वे, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. पवित्रा पाटील, कोर्सचे समन्वयक प्रा. रमेश सरदार यांची उपस्थिती होती.

**बातमी नं. ३**

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करण्यात आले.

यावेळी संचालक डॉ. अजय सुरवाडे, मार्गदर्शक वर्गाचे शिक्षक संदीप भदाणे, अश्विनी पानपाटील, भुषण पाटील व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

## बातमी नं. ४

**जळगाव दि.८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ३२ व्या दीक्षांत समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदवीका प्रमाणपत्र घ्यावयाचे आहेत त्यांनी विलंबाशुल्कासह दि. २० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते आता विलंबशुल्कासह दि. २० डिसेंबर २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.**

विद्यापीठातर्फे डिसेंबर, २०२२ आणि एप्रिल/मे/जून-२०२३ व त्यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी आणि पीएच.डी. धारकांकरिता पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन पदवी / पदविका प्रमाणपत्रासाठी विलंबशुल्कासह दि. २० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. तथापि काही विद्यार्थी, प्राचार्य / संचालकांनी विद्यार्थी हिताच्या दृष्टीने मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. त्या अनुषंगाने व प्राप्त आदेशानुसार पदवी/पदवीका प्रमाणपत्रासाठी पात्र विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज करावयाचा विलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत २० डिसेंबर, २०२३ पर्यंत वाढविण्यात येत आहे. विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Home Page वरील Student Corner-> Examination-> Convocation वर उपलब्ध आहे. विलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि. ०८ डिसेंबर ते २० डिसेंबर, २०२३ पर्यंत आहे. उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षाच्या आत पदवीप्रमाणपत्र शुल्क रूपये ५००/- असून उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यास रूपये १३००/- भरावे लागतील तसेच विलंब शुल्क रूपये १००/- असेल. पदवीप्रमाणपत्राचे शुल्क क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/ नेट बँकिग द्वारे ऑनलाईन भरावे. अर्ज भरतांना सूचनांचे तंतोतंत पालन करावे अर्जात अपूर्णता अथवा त्रुटी आढळून आल्यास आपला अर्ज रद्द करण्यात येईल व कोणतेही शुल्क परत करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी केले आहे.

.........................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ८ डिसेंबर, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी